INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# हैदराबाद मुक्तिसंग्रामातील महिलांचे योगदान

**प्रा. डॉ. आर.ए. चव्हाण**
इतिहास विभाग
महिला महाविद्यालय, गेवराई, जि. बीड
E-mail: rchavan1972@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/09.2021-64828632/IRJHIS2109005

**प्रस्तावना :**

हैदराबाद राज्याची स्थापना इ.स. १७२४ मध्ये निजाम उल-मुल्क यांनी केली. तेव्हापासून आसफजाही घराण्याची निजामीराजवटीला सुरूवात झाली, ती १७ सप्टेंबर १९४८ पर्यंत सात निजामांची सत्ता होती. या निजामाच्या जुलमी राजवटीतून हैदराबाद राज्याला मुक्त करण्यासाठी पुरूषाप्रमाणे महिलांचाही सहभाग होता. 'महिलांची अर्धी शक्ती सहभागाविणा वाया जाते. ही स्त्रीशक्ती उपयोगात आली तर देशाचा दुप्पट विकास होईल'. या म. गांधींच्या उक्तीला प्रतिसाद देऊन निजाम संस्थानातील शेकडो महिलांनी हैदराबाद मुक्तिसंग्रामात उडी घेतली. सशस्त्र लढा व महिलांचा सहभाग हे मुक्तिसंग्रामाचे मानबिंदूच होते. त्यात मराठवाडा व हैदराबादच्या कर्तबगार महिलांची संख्या फार मोठी होती. परिषदा, सभा, संमेलने भरविणे, संघटना स्थापन करणे, स्त्री शिक्षण, स्त्री सुधारणा चळवळ चालविणे, स्वातंत्र्य सैनिकांना गुप्त रितिने वृत्तपत्रे, पत्रके, बातम्या व शस्त्रास्त्र पुरविणे कर्तबगार पुरूषाची पिछडी सांभाळणे व वेळ आल्यास रझाकार व पोलीस दलाशी दोन हात करणे ही महत्वपूर्ण कामे महिलांनी पार पाडली.

हैदराबाद संस्थानातील परिस्थिती लक्षात घेतली तर बाहेरच्या ब्रिटिश हिन्दुस्थानाच्या तुलनेत येथील महिलांनी स्वातंत्र्य आंदोलनात भाग का घेतला नाही हे जसे उमजते तसेच ज्या महिलांनी परिस्थितीची तमा न बाळगता कार्य केले त्यांच्या धाडसाविषयी व त्यागी वृत्तीविषयी आश्चर्य वाटल्या वाचून राहत नाही. हैदराबाद संस्थानात दोन्ही अर्थाने मोगलाई होती. राज्यव्यवस्थेत मोगलाई व एकूण जीवनात कमालीची जातीयता म्हणजेच मोगलाई पुरूषांना जेथे आपल्या गावात व भागात मोकळेपणाने हिंडणे, फिरणे व सार्वजनिक कार्य करणे अवघड होते तेथे महिलांना काय सोसावे लागत असेल याची कल्पना न केलेली बरी. असे असतानाही मराठवाड्यात महिला कार्यकर्त्यांची सेना संख्या आणि गुण या दोन्ही दृष्टींनी बऱ्यापैकी उभी राहिली. या महिलांमध्ये तरूण तसेच वयस्कर अशा महिलांचा समावेश होता. हैदराबाद स्वातंत्र्याच्या संग्रामाला इ.स. १९३७-३८ पासून सुरूवात झाली.[१] लातूर येथील इ.स. १९३८ मधील महाराष्ट्र परिषदेचे वैशिष्ट्ये तेथे महिलांचे संमेलन घेण्यात आले. या संमेलनाच्या अध्यक्षा सौ. काशिबाई किर्लोस्कर होत्या. त्यांनी भाषण करत असताना मराठवाड्यातील साक्षरतेच्या प्रमाणाबाबत खेद व्यक्त केला. त्यांनी हे दाखवून दिले की, मराठवाड्यात

साक्षरतेचे प्रमाण शेकडा तीन आहे. महिलांमध्ये तर ते शेकडा एक सुध्दा नाही. स्त्री ही जीवनातील अमोघ शक्ती आहे. स्त्रियांची उन्नती झाली तरच देशाची उन्नती होईल. त्यांनी आपल्या भाषणामध्ये सामाजिक सुधारणेवर भर दिला. आम्ही महिला केवळ तात्विक चिंतन करत बसल्यामुळे कर्तव्यशून्य झाल्या आहोत. असे सांगून सर्व महिलांनी तात्काळ कार्यास लागावे, असे आवाहन केले. महिला परिषदेत काही ठराव पास केले. साक्षरतेचा प्रसार, प्राथमिक शिक्षण सक्तीचे, मुलींच्या शाळा तपासणीसाठी महिला, आहिल्याबाई व झांशीची राणी जन्मदिन राष्ट्रीय सण, सार्वजनिक संस्थाना दान, मातृभाषेत शिक्षण, कायदेभांगाची तयारी, सत्याग्रह, स्वामीना चिटणीसपद, जबाबदार राज्य पध्दतीची मागणी केली.[२]

**मुक्तिसंग्रामात महिलांचा प्रत्यक्ष सहभाग :**

हैदराबाद मुक्तिलढ्यात महिलांनी जो सहभाग घेतला त्यात ग्रंथालय चालविणे, राजकीय प्रचारातील पत्रके वाटणे, गणपती मेळ्यांत भाग घेणे, सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेणे, चळवळीतील कार्यकर्त्यांना खाद्यपदार्थ पुरविणे, गृहिणी म्हणून घर सांभाळणे यामध्ये ज्या महिलांनी सहभाग नोंदविला त्यात आशाबाई वाघमारे, सुशिलाताई दिवाण, पानकुंवर कोटेचा, सुलोचनाबाई बोधनकर, गोदावरीबाई, लताबाई, उषा पांगरेकर, गीताबाई चारठाणकर, प्रतिभाताई वैशंपायन, दगडाबाई शेळके, तारा परांजपे, करूणाबाई चौधरी, शकुंतलाबाई साले, आदींचा उल्लेख करावा लागतो.

अनेक महिलांनी आपले नाव प्रकाशात न येऊ देता भूमिगत राहून मुक्तिलढ्याचे संघटन केले. दगडाबाई शेळके ह्या महिलेनी हातात ४ तास रायफल घेऊन रझाकारांशी झुंज दिली. पत्रके वाटून आपला सहभाग कुसुमताबाई जोशींनी नोंदविला. स्वदेशी व खादीचा प्रसार शांताबाई कोटेनी केला, स्वामी रामानंद तीर्थ तुरूंगात असताना त्यांच्या बहिनी कमलाबाई यांनी लढ्याची माहिती संकलीत केली, चर्चा, लेखन, साहित्य परिषद आदी माध्यमातून महिलांनी कार्यकर्त्यांचे बळ वाढविले.[३] हैदराबाद स्वातंत्र्यसंग्रामात महिलांनी पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून शत्रुशी लढा दिला. स्टेट कॉंग्रेसच्या आदेशानूसार त्यांनी झेंडा सत्याग्रह व जंगल सत्याग्रहात १५०० महिलांनी सहभाग घेतला होता. सूर्यापेठला रझाकारांनी विद्यार्थ्यांवर लाठीहल्ला केला. त्याच्या निषेधार्थ ऑगस्ट १९४७ मध्ये निजाम कॉलेज पासून निघालेल्या मोर्चात गवळीगुड्याच्या विवेकवर्धिनीतील ५० मुलींनी भाग घेतला. या मोर्चावर रझाकारांनी केलेल्या लाठीहल्ल्यात कालिंदा देशपांडे जखमी झाल्या होत्या. विमलाबाई मेलकोटे व सीताबाई नांदापूरकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या सत्याग्रहात उषा पांगरेकर यांनी एक वर्षाच्या मुलासह भाग घेतला. त्यांना आठ महिन्याची शिक्षा झाली. तारा परांजपे व मनुबाई कुलकर्णी यांनी स्वातंत्र्य आंदोलनात कार्य केले. आशाबाई वाघमारे यांनी औरंगाबादतील गुलमंडीवर तर ईट येथील काकीसाहेब देशमुख यांनी तिरंगा फडकवला.

महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनाप्रमाणे मराठवाड्यात महिलांची नांदेड, औरंगाबाद, सेलू व लातूर येथे मेळावे झाले. १ ऑक्टोबर १९४७ मध्ये औरंगाबाद येथे १०० महिलांनी सरकारच्या विरोधार घोषणा देऊन सत्याग्रह केला. बीड, परभणी, लातूर व उस्मानाबाद येथे असेच सत्याग्रह झाले. कल्हाळी येथील दलित महिलांनी रझाकारांशी कडवी झुंज दिली.[४] रझाकार आणि पोलीस यांच्या संयुक्त अत्याचाराला उत आला. कासिम रझवीचा भाऊ तय्यब, भोतकूरचा दाढीवाला आसीम, सिकंदराबादचा महमद हाजी, एका खेड्यात आले असता दुपारी चहाकरिता दूध मिळेना तेव्हा त्या खेड्याच्या पाटलाला त्यांनी उन्मतपणे हुकूम केला! "गाई म्हशी दूध देत नाहीत तर तुम्ही तुमच्या बायकांचे दूध ताबडतोब

घेऊन या हम को चाय पिना है".[५] महाराष्ट्र परिषद चालु असताना संस्थानातील महिलांनी लातूर महिला संमेलन (१९३८), औरंगाबाद (१९४३), सेलू (१९४५), लातूर (१९४६) मध्ये महिला परिषद भरवून फार मोठी महिला शक्ती संघटित केलेली होती. तुंगाबाई बेळुर्गीकर तुरूंगात गुप्तपत्रे वाटण्याचे कार्य करीत होत्या, राजकुंवर विजयेंद्र काबरा जीव धोक्यात घालून स्वातंत्र्य सैनिकाला मदत करीत नांदेडच्या ताराबाई परांजपे व पद्माकर लाढकर यांनी भोईवालीचा वेश धारण करून सुलतान बाजारातील छोटा खटला गल्ली मधील स.कृ. वैशंपायनच्या घरातील सायक्लोस्टाईलने मशीन शिताफीने पळविले व जाताना पोलीस पहारेकऱ्यांना 'निकडपू सल्लागा उँडणी' (तुझा वंश वाढू दे) असा तोंडभरून आशीर्वाद दिला. आशाबाई वाघमारे पतीच्या खांद्याला खांदा देऊन कार्य करत होत्या. एकदा तर भिकारणीचा वेश घेऊन गुलमंडीच्या सत्याग्रहींना गुप्तपणे पत्रके वाटप केलेली आहेत. कॉम्रेड करूणा चौधरी यांचे धाडस असेच अभूतपूर्व होते. औरंगाबादच्या सुपारी हनुमान मंदिरापाशी त्यांनी काढलेला मोर्चा पोलीसांनी अडवला असताना सुध्दा तिरंगा झेंडा फडकविण्याचे धाडस दाखविले. पोलीस झेंडा हिसकावण्याचा प्रयत्न करीत होते. प्रसंगावधान राखून करूणाबाईने मांडीवर झेंडा आंथरून त्यावर ज्योती ह्या आपल्या कन्येला झोपविले व भाषण केले सर्व पोलीस अवाक होऊन भाषण ऐकत राहिले. सौ. गीताबाई विनायकराव चारठाणकर यादेखील निर्भय क्रांतीकारक भगीणी होत्या. वाशीम कँम्पच्या स्वातंत्र्य सैनिकांना त्या बंदुका, पिस्तुले, रिव्हाल्वर, काडतुसे व हातबाँम्ब पुरविण्याचे काम करीत असत. छत्रपती शिवाजी महाराजांचा गनिमी कावा युध्दनिती येथील स्त्री-पुरूषांच्या रक्तातच भिनलेला होता.[६]

नांदेड मुक्तिलढ्याचे केंद्र होते. या परिसरातील महिला पिछाडीस राहणे शक्यच नव्हते. सुलोचनाबाई, लताबाई, इंद्रायणी बोधनकर, शकुंतलाबाई साले, कृष्णाबाई रत्नाळीकर, रमाबाई गांजवे, सरस्वतीबाई सरदेशपांडे, तान्याबाई पाटील, चंद्रभागाबाई पाटील, गंगुबाई देव, ह्या सर्वजनी धैर्यशाली स्वातंत्र्य सैनिक महिला होत्या. दगडाबाई शेळके ह्या तर अग्रभागी होत्या. झाशीच्या राणीचे शौर्य तीच्या ठायी होते. टाकळी कोलते पिंपळगावी जन्मलेल्या या भद्रकालीने स्टेट काँग्रेसचे सदस्यत्व स्वीकारले व टाकळी कँम्पच्या प्रमुख बनल्या घोड्यावर बसून खांद्यावर बंदूक घेऊन त्या मुस्लीम वस्तीत निर्भयपणे पहारा देत होत्या. पोलीस कारवाईत कन्हेरगाव कँम्पात त्या सक्रिय होत्या. अनेक चळवळीत व सत्याग्रहात त्यांचा पुढाकार होता. म्हणूनच दगडाबाई शेळके यांना मुक्तिसंग्रामातील महिला योध्दा मानले जाते.[७]

हैदराबाद राज्यातील आसफजाही घराण्याची निमाजामी राजवट ह्या सात निजामांच्या नावाने ओळखली जाते. निजाम उल-मुल्क (१७२४ ते १७४८) पहिला, निजाम अलीखान (१७६२ ते १८०३) दुसरा, निजाम सिकंदरजहा (१८०३ ते १८२९) तीसरा, निजाम नासिर उद्दौला (१८२९ ते १८५७) चौथा, निजाम अफजल उद्दौला (१८५७ ते १८६९) पाचवा, निजाम मीर महबुब अली (१८६९ ते १९११) सहावा, निजाम मीर उस्मानअलीखान (१९११ ते १९४८) सातवा, यांच्या राजवटीचा शेवट १७ सप्टेंबर १९४८ ला झाला.

**निष्कर्ष :**

१) हैदराबाद मुक्तिलढ्यात पुरूषांबरोबर महिलांचा सभाग होता.

२) हैदराबाद मुक्तिलढ्यात महिलांना तुरूंगवास भोगावा लागला.

३) हैदराबादच्या निजाम राजवटीचा अंत होऊन ते भारतात विलीन झाले.

**सारांश :**

निजामशाहीतील हजारो ज्ञात अज्ञात देशभक्तांचे बलिदान पाहिले की, 'रणाविण स्वातंत्र्य कोणा मिळाले' ह्या वचनाची खात्री पटते. संस्थानातील स्त्री-पुरूष, आबाल-वृध्द, ग्रामीण-शहरी, श्रीमंत-गरीब, हिन्दू-मुस्लीमच्या रूधिराभिषेकाने मुक्तिसंग्रामचा मार्ग सुकर केला. निष्ठापूर्वक ध्येयसिध्दीसाठी केलेले आत्मसमर्पण म्हणजे हौतात्म्य मराठवाडा, कर्नाटक व आंध्रप्रदेशातील निरागस देशभक्तांनी केलेल्या आत्मबलिदानाची वीरगाथा फार मोठी आहे. त्यातील प्रातिनिधीक हुतात्म्यांचा येथे निर्देश केलेला आहे. या धैर्यशील हौतात्म्याची परंपरा वेदप्रकाशच्या बलीदानापासून सुरू झाली. १५ ऑगस्ट १९४७ ला भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले त्यात दोन तृतीयांश भागच स्वातंत्र्य झालेला होता. सुमारे सहाशे संस्थानाचा मोठा प्रदेश मुक्त व्हावयाचा होता. त्यात काश्मिर व हैदराबाद ही संस्थाने म्हणजे मोठ्या बलाढ्यराज्याचे होती. १७ सप्टेंबर १९४८ ला भारताच्या इतिहासाने आपले एक दप्तर गुंडाळले. निजामांच्या जुलमी राजवटीतून हैदराबाद संस्थान मुक्त होऊन भारतात विलीन झाले.

**संदर्भ सूची : -**

१) भालेराव अनंत, हैदराबाचा स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा, मौज प्रकाशन, मुंबई, १ डिसेंबर २०१२, पृ.क्र. ३५४

२) डॉ. करपे राजेश, मराठवाड्याचा इतिहास, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, १५ जुलै २०१६, पृ.क्र.१५९, १६०

३) डॉ. गाठाळ एस. एस., आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, जुलै २०१३, पृ.क्र. ३९६, ३९७

४) डॉ. कठारे अनिल, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, जून २००९, पृ.क्र. ५३०

५) पोतदार वसंत ब., हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम, विद्याभारती प्रकाशन, लातूर, २००६, पृ.क्र. ४६

६) डॉ. जोशी पी.जी., मुक्तिगाथा-मुक्तिदाता, क्रिएटिव्ह पब्लिकेशन्स, नांदेड, १७ सप्टेंबर २००९, पृ.क्र. ८९

७) कित्ता, पृ.क्र. ९०